MHYA160004242015

खटला दाखल तारीख : ०३.१०.२०१५
खटला नोंदणी तारीख : ०३.१०.२०१५
निकालाची तारीख : २४.०३.२०२६
कालावधी : १० वर्ष ०५ महिने २१ दिवस

# न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी यांचे न्यायालय,बाभुळगाव

(पीठासीन अधिकारी – श्री एच.एस.सातपुते यांचे समोर)

**नियमीत फौजदारी खटला क्र. ११७/२०१५.** **निशाणी क्र. ७९/ब**

- महाराष्ट्र सरकार मार्फत
  पोलीस ठाणे बाभुळगाव,
  ता. बाभुळगाव जि. यवतमाळ. ....**अभियोग पक्ष.**

:: **विरुध्द** ::

(१) सुनिल शंकरराव डेबुर
वय : २७ वर्ष, धंदा : मजूरी,
(२) प्रविण रामदास गाडेकर (मयत)
वय : २१ वर्ष, धंदा : मजूरी,
(३) नामदेव शंकर भारती
वय :२७ वर्ष, धंदा : मजूरी,
सर्व, राहणार : खर्डा, ता. बाभुळगाव,
जिल्हा यवतमाळ. ....**आरोपी.**

**गुन्हा – भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ३७९ सह कलम ३४ अन्वये.**

.................................................................................................................

- सहाय्यक सरकारी अभियोक्ता – श्री. पी. डी. राठोड
- आरोपीचे विधीज्ञ – श्री. जी. व्ही. कडूकार

.................................................................................................................

# न्यायनिर्णय

(आज दिनांक २४ मार्च, २०२६ रोजी पारीत)

आरोपी क्र. १ ते ३ विरुध्द भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ३७९ सह कलम ३४ अन्वये दोषारोप ठेवण्यात आला आहे.

अभियोग पक्षाची हकीकत थोडक्यात खालील प्रमाणे :-

२) दिनांक २०.०५.२०१५ रोजी फिर्यादी मोहम्मद तंजीम हुसेन हा सकाळी ६.०० वाजण्याच्या सुमारास त्याचा पानठेला उघडण्याकरीता गेला. त्यावेळी फिर्यादीला त्याच्या पानठेल्याचे एक कुलुप खाली पडलेले दिसून आले व दुसरे कुलुप लागुन असल्याचे दिसून आले. फिर्यादीने पानठेल्याच्या आतमध्ये पाहीले. त्यावेळी सुपारी ७ किलो, ४ पुडे युम, ६नग माजा डब्बे, ३० ब्रिस्टॉल पॉकेट, ३० गोल्ड पॉकीट आणि पानठेल्याच्या गल्यातील नगदी १०००/- रुपये असा एकुन ५०००/- रुपयाचा माल कोणीतरी अज्ञात चोरटयांनी चोरुन नेल्याचे दिसून आले. त्यामुळे फिर्यादीने अज्ञात इसमाविरुध्द पोलीस स्टेशनला रिपोर्ट दिला.

३) फिर्यादीने दिलेल्या लेखी रिपोर्टवरुन पोलीस ठाणे बाभुळगाव येथे आरोपी अज्ञात व्यक्तीविरुध्द भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ३७९ प्रमाणे अपराध क्र. ८६/२०१५ नोंदविण्यात आला आहे. तपासाचे काम सहाय्यक पोलीस नाईक काशीनाथ किसनराव राठोड यांच्याकडे दिल्यानंतर त्यांनी साक्षीदारांचे जाबजवाब नोंदविले आहेत. इतर कागदपत्रे मिळाल्यानंतर आरोपी क्र. १ ते ३ विरुध्द तपासाअंती पुरेसा पुरावा मिळून आल्याने न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले आहे.

४) माझे पूर्व पिठासीन अधिकारी यांनी आरोपीविरुध्द निशाणी क्र. २९ वर भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ३७९ सह कलम ३४ अन्वये दोषारोप ठेऊन आरोपींना मराठी भाषेत वाचून व समजावून सांगितला असता आरोपींनी दोषारोपातील मजकूर कबुल नसल्याचे सांगून संपरिक्षेची मागणी केली आहे. सदरचे प्रकरण चालु असतांना आरोपी क्र. २ प्रविण रामदास गाडेकर हा मयत झाला आहे.

५) आरोपी विरुध्द दोषारोप सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाने तिन साक्षीदार

तपासले आहेत. निशाणी क्र. ३३ वर साक्षीदार क्र. १ मोहम्मद तंजीम मोहम्मद सजात हुसेन(फिर्यादी), निशाणी क्र. ७२ वर साक्षीदार क्र. २ गजानन त्र्यंबकराव पोहणकर (दाखल अधिकारी), निशाणी क्र. ७३ वर साक्षीदार क्र. ३ काशीनाथ किसनराव राठोड (तपासीक अधिकारी) अन्वये तपासले आहेत. दिनांक २४/०३/२०२६ रोजी अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला आहे.

६) आरोपींचे भारतीय नागरीक सुरक्षा संहितेच्या कलम ३५१ प्रमाणे स्पष्टीकरण अनुक्रमे निशाणी क्र. ७७ व ७८ प्रमाणे नोंदविण्यात आले आहे. आरोपींनी त्यांच्याविरुद्ध खोटी केस केली आहे, असा बचाव घेतलेला आहे.

७) अभिलेखावरील पुरावा व दोन्ही पक्षांचे युक्तीवाद यावरुन खालील मुद्दे माझे अवलोकनार्थ उपस्थित झाले आहेत. त्या प्रत्येक मुद्दयांना मी कारणांसह खालीलप्रमाणे उत्तर दिलेले आहे.

| **अ.क्र.** | **वाद मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १) | अभियोग पक्षाने हे सिध्द केले काय की, दिनांक १९/०५/२०१५ ते २०/०५/२०१५ रोजी मध्यरात्री आरोपींनी संगणमत करुन मौजा बाभुळगाव ता. बाभुळगाव जि. यवतमाळ येथील फिर्यादी नामे मोहम्मद तंजीम हुसेन याच्या पानठेल्यातून २०००/– रुपयाची चोरी केली. त्यामुळे आरोपींनी भारतीय दंड विधान कलम ३७९ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला आहे ? | ..... नाही. |
| २) | काय आदेश ? | ...अंतिम आदेशाप्रमाणे. |

**अभियोग पक्ष निशाणी क्र. निशाणी क्र. ३४ वरील जबानी रिपोर्ट, निशाणी क्र.३५ वरील प्रथम खबर अहवाल, निशाणी क्र. ७४ वरील घटनास्थळ पंचनामा, आर्टीकल–अ वरील निवेदन पंचनामा, निशाणी क्र. ७५ वरील जप्ती पंचनामा व निशाणी क्र. ७६ वरील मुद्देमाल पावती इ. कागदोपत्री पुराव्यावर विसंबुन आहे.**

## :: कारणमिमांसा ::

**मुद्दा क्र.१ करीता**

८) आरोपीन क्र. १ ते ३ यांनी दिनांक १९/०५/२०१५ ते २०/०५/२०१५ रोजी फिर्यादीच्या पानठेल्यातून २०००/– रुपयाची चोरी केली हे सिध्द करण्याकरीता १ ते ३ साक्षीदारांना तपासले आहेत.

९) अभियोग पक्षाचा साक्षीदार क्र. १ याने न्यायालयाच्या पुढे शपथेवर असे सांगीतले आहे की, तो आरोपीला ओळखत नाही. त्याचा बाभुळगाव बसस्टॅंन्डवर पानठेला आहे. दिनांक २०.०५.२०१५ रोजीची घटना आहे. तो सकाळी पानठेला उघडण्याकरीता गेला होता. त्यावेळी त्याच्या पानठेल्याची दोन्ही कुलुपे तुटलेले होते. त्यामधील माल चोरीला गेला होता. नगदी १०००/– रुपये सुध्दा चोरीला गेले होते. चोरीला गेलेला माल हा ५०००/– रुपये किंमतीचा होता. त्यामुळे त्याने निशाणी क्र. ३४ प्रमाणे त्यांनी रिपोर्ट दिला व निशाणी क्र. ३५ वरील प्रथम खबरी अहवाल त्यांनी दिला असल्याचे सांगीतले. त्यातील मजकुर खरा व बरोबर असल्याचे सांगुन त्यावर त्याची सही असल्याचे सांगीतले.

१०) अभियोग पक्षाचा साक्षीदार क्र. २ हा दाखल अधिकारी असून न्यायालयाच्या पुढे शपथेवर असे सांगत आहे की, दिनांक २०.०५.२०१५ रोजी तो पोलीस स्टेशन बाभुळगाव येथे पोलीस नाईक म्हणून कार्यरत होता. त्यादिवशी ते स्टेशन डायरीवर कार्यरत असतांना मोहम्मद तंजीम मोहम्मद हुसेन हा त्यांच्याकडे फिर्याद घेवून आला होता. त्याने त्याचा निशाणी क्र. ३४ वरील जबानी रिपोर्ट नोंदविला होता. सदरचा जबानी रिपोर्ट हा पानठेल्यातील चोरीबाबत होता. त्यांनी निशाणी क्र. ३५ वरील प्रथम खबरी अहवाल हा भां. दं. वि चे कलम ३७९ अन्वये नोंदविला होता. त्याचा अपराध क्र. ८६/२०१५ होता. त्यावर त्याच्या व फिर्यादीच्या सहया आहेत. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे.

११) अभियोग पक्षाचा साक्षीदार क्र. ३ हा न्यायालयाच्या समोर शपथेवर असे सांगत आहे की, सन २०१५ रोजी ते पोलीस स्टेशन बाभुळगाव येथे पोलीस हेड कॉन्स्टेबल म्हणून कार्यरत होते. दिनांक २०.०५.२०१५ रोजी अपराध क्र. ८६/२०१५ भा.दं.वि.कलम ३७९ या गुन्ह्याचे तपासकाम त्यांच्याकडे सोपविण्यात आले. त्यामध्ये त्यांना रिपोर्ट, एफ. आय. आर,

जबानी रिपोर्ट इत्यादी कागदपत्रे प्राप्त झाली होती. आरोपींनी पोलीस कस्टडीत असतांना सदरचा गुन्हा केल्याची कबुली दिली होती. त्यानंतर त्यांनी आरोपींना ताब्यात घेवून दोन पंचासह दिनांक २०.०५.२०१५ रोजी मौजा बाभुळगाव येथील मोठया बसस्टॅन्डवर घटनास्थळ पंचनामा करण्याकरीता केले. सदरचे घटनास्थळ हे त्यांना फिर्यादीने दाखविले होते. त्यांनी निशाणी क्र. ७४ वरील घटनास्थळ पंचनामा केला. त्यावर त्यांच्या व दोन पंचांच्या सहया आहेत. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यानंतर त्यांनी आर्टीकल–अ वरील निवेदन पंचनामा केला. त्यावर दोन पंचांच्या व त्यांच्या सहया आहेत. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यानंतर त्यांनी दिनांक २९.०६.२०१५ रोजी एक किलो सुपारी, १० पॉकीट सिगारेट व ५ पॉकीट ब्रिस्टाल निशाणी क्र. ७५ वरील जप्ती पंचनाम्याने जप्त केला. त्यावर त्याची व दोन पंचांच्या सहया आहेत. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यानंतर त्यांनी निशाणी क्र. ७६ मुद्देमाल पावतीने सदरचा मुद्देमाल पोलीस स्टेशनच्या मोररकडे जमा केला. त्यानंतर त्यांनी आरोपीविरुद्ध दोषारोपपत्र दाखल केले आहे.

१२) अभियोग पक्षाचा लेखी व तोंडी पुरावा, अभियोग पक्षातर्फे सहाय्य सरकारी अभियोक्ता श्री. पी. डी. राठोड व आरोपीतर्फे श्री. जी. व्ही. कडूकार यांचा सविस्तर युक्तीवाद ऐकल्यानंतर मी अभिलेखावर आलेल्या लेखी व तोंडी पुराव्यावरील चर्चेकरीता वळत आहे. अभियोग पक्षाने उलटतपासात साक्षीदार क्र.१ याच्या निशाणी क्र. ३४ वरील जबानी रिपोर्ट मधील मजकुर व निशाणी क्र. ३५ वरील प्रथम खबर अहवालातील मजकुर न्यायालयाच्यापुढे सिध्द केला आहे. साक्षीदार क्र. १ हा आरोपींना ओळखत नसल्याचे त्याच्या सरतपासात सांगत आहे. साक्षीदार क्र. १ हा दिनांक २०.०५.२०१५ रोजी बाभुळगाव येथील मोठया बसस्थानकाजवळ असलेला त्याचा पानठेला उघडण्याकरीता सकाळी गेला होता. त्यावेळी त्याने त्याच्या पानठेल्यातील मुद्देमाल चोरीला गेल्याचे पाहीले होते. साक्षीदार क्र. १ हा त्याच्या उलटतपासात त्याच्या पानठेल्यामध्ये कोणी चोरी केली होती हे त्याला माहीती नसल्याचे सांगत आहे. अभियोग पक्षाने साक्षीदार क्र. २ याच्या तोंडी पुराव्याने निशाणी क्र. ३४ वरील जबानी रिपोर्ट व निशाणी क्र. ३५ वरील छापील प्रथम खबरी अहवाल हा दाखल करुन घेतल्याचे सिध्द केले आहे. सदरची बाब ही तांत्रीक बाबींवर अवलंबुन असल्याने त्याविषयी चर्चा करण्याची आवश्यकता नाही. अभियोग पक्षाने साक्षीदार क्र. ३ याच्या तोंडी पुराव्याने निशाणी क्र. ७४ वरील

घटनास्थळ पंचनाम्यातील मजकुर न्यायालयाच्यापुढे सिध्द केला आहे. साक्षीदार क्र. ३ हा तपासीक अधिकारी असून त्याच्या तोंडी पुराव्याने अभियोग पक्षाने आर्टीकल–अ वरील निवेदन पंचनाम्याची छायांकीत प्रत न्यायालयाच्यापुढे सिध्द केली आहे. साक्षीदार ३ याच्या तोंडी पुराव्याने निशाणी क्र. ७५ वरील जप्ती पंचनाम्यातील मजकुर न्यायालयाच्यापुढे सिध्द केला आहे. आरोपींच्या विधिज्ञांनी साक्षीदार क्र. ३ याचा उलटतपास घेतला असता त्याने आरोपींची ओळखपरेड घेतलेली नव्हती व दुसऱ्या गुन्हयातून आरोपींचा ताब्यात घेण्याबाबत न्यायालयाची परवानगी घेतलेली नव्हती असे न्यायालयाच्यापुढे सांगीतलेले आहे. अभियोग पक्षाने न्यायालयाच्यापुढे जबानी रिपोर्ट, छापील प्रथम खबरी अहवाल, घटनास्थळ पंचनामा व जप्ती पंचनामा सिध्द केला असला तरी आरोपी क्र. १ ते ३ यांचा चोरीच्या गुन्हयामध्ये प्रत्यक्ष सहभाग सिध्द झालेला नाही. त्यामुळे आरोपी क्र. १ ते ३ विरुध्द निशाणी क्र. २९ वर ठेवलेला भारतीय दंड विधान १८६० चे कलम ३७९ सह कलम ३४ अन्वये ठेवलेला दोषारोप सिध्द होत नाही. त्यामुळे सदरच्या गुन्हयातून आरोपीला दोषमुक्त करणे योग्य राहील. म्हणून मी मुद्दा क्र. १ चे उत्तर नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र. २ करीता</u>**

१३) अभियोग पक्षाच्या लेखी व तोंडी पुराव्यावरुन मी या निष्कार्षास आलेलो आहे की, भारतीय दंड विधान १८६० चे कलम ३७९ सह कलम ३४ लागू करण्यासाठी आवश्यक असणारे घटक संशयाचे पलीकडे जाऊन आरोपीविरुध्द सिध्द झालेले नाहीत. म्हणून मी मुद्दा क्र. २ चे उत्तराकरीता खालील आदेश पारीत करीत आहे.

**–: आदेश :–**

(१) आरोपी क्र. १सुनिल शंकरराव डेबुर, आरोपी क्र. २ प्रविण रामदास गाडेकर (मयत) व आरोपी क्र. ३ नामदेव शंकर भारती यांना भारतीय दंड विधान १८६० चे कलम ३७९ सह कलम ३४ या गुन्हयातून भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २७१(१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

(२) आरोपीचे वैयक्तीक बंधपत्र व जामीन कदबे रद्द करण्यात येतात.

(३) पोलीस स्टेशन बाभुळगाव यांना असे आदेशीत करण्यात येते की, जप्त मुद्देमाल

एक किलो सुपारी, १० पॉकेट सिगारेट गोल्ड कंपनीचे व ५ पॉकेट ब्रिस्टाल हे अपील कालावधी संपल्यानंतर नष्ट करण्यात यावेत.

(३) आरोपींनी १ व ३ यांनी भारतीय नागरीक सुरक्षा संहिताचे कलम ४८१ प्रमाणे, या निर्णयाविरुध्द अपील झाल्यास त्यातील त्यांची उपस्थितीची हमी म्हणून प्रत्येकी रु. १५,०००/– रकमेचे जमानत द्यावी. आरोपीने दिलेले वैयक्तीक जमानत आजपासून सहा महिन्यापर्यंत वैध राहील.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर केला)

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by HARIDAS SANDIPAN SATPUTE
Date: 2026.03.25 17:52:25 +0530

बाभुळगाव. (एच.एस.सातपुते)

दिनांक :२४/०३/२०२६. न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,

बाभुळगाव.